आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -  दुपारी ३.००वाजता

१५ मे २०२४ - बुधवार

निवडणुकांच्या काळात राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सामाजिक भान जपत प्रचारातील भाषणांचा दर्जा चांगला राखून आदर्श उदाहरण घालून द्यावं, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. देशाच्या सामाजिक सलोख्याला तडा जाऊ नये म्हणून निवडणूक प्रचार सभांची भाषा संयत ठेवणं ही प्रथमतः नेत्यांची जबाबदारी आहे, असंही आयोगानं म्हटलं आहे. विविध राजकीय पक्षांनी दाखल केलेल्या आचार संहिता भंगाच्या तक्रारींपैकी ९० टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्याचंही आयोगानं सांगितलं.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या या टप्प्यासाठीच्या प्रचारानं आता वेग घेतला आहे. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज नाशिक आणि दिंडोरी मतदारसंघातल्या उमेदवारांसाठी जाहीर सभा घेणार आहेत. त्यानंतर ते कल्याणमध्ये महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारसभेला संबोधित करतील आणि संध्याकाळी मोदी मुंबईत घाटकोपर इथं रोड शो करणार आहेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याही आज नाशिकमध्ये सभा होणार आहेत.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ' उत्तर मध्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

भारतीय वायुसेनेच्या स्वदेश निर्मित भीष्म क्यूब या मोबाईल रुग्णालयाचं आज आग्रा इथं यशस्वी परिक्षण झालं.

हे अत्याधुनिक मोबाईल रुग्णालय भारत हेल्थ इनिशिएटीव फॉर सहयोग हित अँड मैत्री या भव्य उपक्रमाचा एक भाग आहे. या मोबाईल रुग्णालयात एकावेळी जवळपास २०० रुग्णांवर उपचार करता येतील. वॉटरप्रूफ, कमी वजनाचं आणि अत्याधुनिक असं हे मोबाईल रुग्णालय आपत्कालीन परिस्थितीतल्या वैद्यकीय सेवेसाठी सर्वोत्तम पर्याय म्हणून उभारण्यात आलं आहे.

<><><><><>

मुंबईत घाटकोपर परिसरात गेल्या सोमवारी होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेतले आणखी दोन मृतदेह आज बाहेर काढण्यात आले. कोसळलेलं होर्डिंग आणि अन्य राडारोडा हटवण्याचं काम अद्याप सुरु आहे. घटनास्थळावर पेट्रोलपंप असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीनं हे काम काळजीपूर्वक करावं लागत आहे. पेट्रोलपंपावर आज अचानक आग लागली होती. मात्र ती ताबडतोब आटोक्यात आणण्यात आली. या दुर्घटनेत १४ जण मरण पावले तर ४३ जखमींवर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान याप्रकरणी होर्डींगमालकावर गुन्हा दाखल झाला असून तो फरार आहे.

<><><><><>

घाटकोपर इथल्या होर्डींग दुर्घटनेनंतर राज्यातल्या अनेक शहरांमधे बेकायदा आणि धोकादायक होर्डींगविरुद्ध कारवाई सुरु झाली आहे. नंदुरबार शहरात २२ खाजगी इमारतींवर होर्डींग उभारण्यात आलेले असून या सर्वांचं स्ट्रक्चरल ऑडीट, आणि होर्डींग्ज स्थिरता प्रमाणपत्र पंधरा दिवसांच्या आत पालिकेला सादर करण्याच्या नोटीसा संबंधीतांना देण्यात आल्या आहेत.

नवी मुंबई महापालिका हद्दीत अनेक ठिकाणी विविध जाहिरात कंपन्याकडून मोठमोठी होर्डीग्ज उभारण्यात आली आहेत. शहरात साधारण २०० च्या आसपास परवाधानारक मोठाले होडींग्ज, युनिपोल  उभारण्यात आले आहेत. त्यापैकी खासगी ठिकाणी उभारलेल्या ७५ होर्डीग्ज धारकांना यापूर्वीच  महापालिकेने नोटीसा पाठविल्या आहेत.

<><><><><>

वांद्रे वरळी सागरी सेतू आणि मुंबई किनारी मार्ग यांना सांधण्यासाठी दुसरी तुळई आज सकाळी यशस्वीपणे स्थापन केली गेली. सुमारे अडीच हजार मेट्रीक टन वजनाची ही तुळई बसवण्याच्या कामाला पहाटे तीन वाजता सुरवात झाली. सकाळी सहा नंतर हे काम पूर्ण झालं. तुळईला गंज चढू नये म्हणूल सी-५ या जपानी तंत्रज्ञानाचा वापर केला गेला आहे. यावेळी महापालिका आयुक्त आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुवाहाटी इथं राजस्थान रॉयल्सचा सामना पंजाब किंग्जशी होणार आहे. पंजाब किंग्ज संघ आधीच प्ले ऑफमधून बाहेर पडला आहे, तर राजस्थान रॉयल्सचं अव्वल चार संघात स्थान मिळवण्याचं लक्ष्य असेल.

<><><><><>

धुळे लोकसभा मतदार संघात निवडणूकीसाठी मतदानाच्या दिवशी अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेल्या २०९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी काल टपाली मतपत्रिकाद्वारे मतदान  केलं. उद्यापर्यंत हे टपाली मतदान करता येणार आहे.

<><><><><>

भारतीय सैन्यातील माजी कर्नल वैभव काळे यांना गाझा पट्टीत राफा इथं वीरमरण आलं. भारतीय सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर ते संयुक्त राष्ट्र-यूएनच्या सैन्यात प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते. त्यांचं शिक्षण नागपूर इथं झालं होतं.

**<><><><><>**

इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर प्रत्येक गरीब कुटुंबाला दरमहा दहा किलो अन्नधान्य मोफत दिलं जाईल, असं आश्वासन काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज दिलं. उत्तर प्रदेशमध्ये लखनौ इथं मल्लिकार्जुन खर्गे आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यावेळी खर्गे बोलत होते.

**//<><><><><>//**